| MHKO110001052017 | दाखल दिनांक | - | २०/०९/२०१६ | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंद दिनांक | - | २०/०९/२०१६ | | |
| | निकाल दिनांक | - | ०७/०७/२०२६ | | |
| | कालावधी | - | वर्ष | महीने | दिवस |
| | | | ०९ | ०९ | १८ |

## प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठवडगाव
## यांचे न्यायालयात
## (पिठासिन अधिकारी - श्रीमती. आर. एस. मोरे)

**नियमित फौजदारी खटला क्र. १३७/२०१६**
**नि. क्र. ५८/ बी**

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन** तर्फे पोलीस ठाणे अधिकारी,<br>वडगांव पोलीस ठाणे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| **अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ** | श्री. व्ही. पी. कुसुरकर, सहा. सरकारी अभियोक्ता. |
| **आरोपी** | **१. अभिषेक उर्फ अभिजित राजाराम तोडकर**<br>व.व.२०, धंदा - शिक्षण,<br>**२. ऋषीकेश उर्फ सुरज निवास चौगुले,**<br>व.व.१९, धंदा - शिक्षण,<br>**३. आकाश जयसिंग कांबळे(भोई),**<br>व.व.२३, धंदा - मजुरी,<br>सर्व रा. नवे पारगाव, ता. हातकणंगले,<br>जि. कोल्हापूर. |
| **आरोपी तर्फे विधिज्ञ** | श्रीमती संजीवनी पाटील |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | २९/१२/२०१५ |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | २६५/२०१५ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २०/०९/२०१६ |

| | |
|---|---|
| दोषारोप ठेवलेचा दिनांक | ०८/०८/२०१८ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | १८/०१/२०२० |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | ०७/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०७/०७/२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>आरोपींविषयी माहिती</u>

| अनु. क्र. | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपा- तील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|
| **१.** | **अभिषेक उर्फ अभिजित राजाराम तोडकर** | ३१/१२/२०१५ | १४/०१/२०१६ | भा.दं.वि.सं. कलम ३२४, ३२३ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता | --- |
| **२.** | **ऋषीकेश उर्फ सुरज निवास चौगुले** | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | --- |
| **३.** | **आकाश जयसिंग कांबळे (भोई)** | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | --- |

# <u>न्यायनिर्णय</u>

( आज दिनांक ०७ जुलै, २०२६ रोजी घोषित )

आरोपी क्र. १ ते ३ वर भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याबाबत दोषारोप आहे.

## <u>अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे</u> -

**०२.** दि. २९/१२/२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजणेचे सुमारास हॉटेल जोतिर्लिंग चे पाठीमागे मोकळया जागेत नवे पारगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे फिर्यादी अक्षय दिलीप शिंदे व निलेश कांबळे हे आरोपी क्र. ३ च्या बोलवण्यावरून जोतिर्लिंग हॉटेल मध्ये गेले असता आरोपी क्र. १ ते ३ यांनी फिर्यादी व निलेश कांबळे यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली व आरोपी क्र. ३ ने फिर्यादीच्या डोक्यात सॅक व स्टीलचा डबा मारून जखमी केले. त्यानंतर फिर्यादी यांनी वडगांव पोलीस ठाण्यात जाऊन आरोपीच्या विरोधात तक्रार दाखल केली.

**०३.** सदर फिर्यादला अनुसरून आरोपीविरुद्ध वडगांव पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. २६५/२०१५ असा नोंद झाला. गुन्ह्याचा तपास एन. जी. मोरे – पोलिस हेड कॉन्स्टेबल यांचेकडे सोपविण्यात आला. तपासी अधिकारी यांनी संबंधीत साक्षीदारांचे बयान नोंदवून घेतले, घटनास्थळाचा पंचनामा केला व जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र जमा केले. आरोपींविरुद्ध पुरेसा पुरावा मिळून आल्यामुळे त्यांनी आरोपींविरुद्ध फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३ प्रमाणे दोषारोपपत्र सादर केले.

**०४.** माझे पूर्वपिठासीन अधिकारी यांनी आरोपी हजर झाले असता **निशाणी क्र. १३** वर आरोपी वर भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवण्यात आला. सदर दोषारोप आरोपींना मातृभाषेत वाचून व समजावून सांगण्यात आले. आरोपींनी त्यांच्यावरील आरोप नाकारून खटल्याची संपरिक्षा घेण्याची मागणी केली.

**०५.** अभियोग पक्षाने सदर प्रकरणात पंच साक्षीदार क्र.१ - अमित सिकंदर आढाव, यांची साक्ष **निशाणी क्र.२१** वर, पंच साक्षीदार क्र. २ - मोहन शंकर सिद यांची साक्षी **निशाणी क्र. ४४** वर व फिर्यादी साक्षीदार क्र. ३ - अक्षय दिलीप शिंदे यांची साक्षी **निशाणी क्र. ५३** वर नोंदवली आहे. अभियोग पक्षाने आपली भिस्त दि. ३०.१२.२०१५ रोजीचा पंचनामा **- निशाणी क्र. २२,** समजुतीचा नकाशा **- निशाणी क्र. २३,** दि. ३१.१२.२०१५ रोजीच्या पंचनाम्यावरील अ. क्र. २ वरची सही - **निशाणी क्र. ४५,** दि. २९.१२.२०१५ च्या जबाबावरची फिर्यादीची सही **- निशाणी क्र. ५४** कागदोपत्री पुराव्यावर ठेवली. आरोपींविरुद्ध कोणताही आक्षेपार्ह पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता

कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नोंदवण्यात आले नाही. **निशाणी क्र. ५२** च्या पुरसिस नुसार फिर्यादी व आरोपी यांचेदरम्यान तडजोड झालेली असून सदरची फिर्याद गैरसमजूतीमधून दाखल केलेली होती. तसेच, फिर्यादी यांना आरोपीविरूध्द कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे फिर्यादी यांना काम पूढे चालवणेचे नसल्याने फिर्यादी यांनी **निशाणी क्र. ५६** वर पुरसिस दाखल करून तोंडी पुरावा संपल्याचे कथन केले. सदरची केस मध्ये नि. १ च्या आदेशानुसार अभियोग पक्षाचे पुरावे बंद करण्यात आले.

**०६.** अभियोग पक्षाचे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. पी. कुसुरकर व आरोपींचे विद्वान विधिज्ञ श्रीमती संजीवनी पाटील यांचा युक्तिवाद ऐकला.

**०७.** दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून व अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर माझे विवेचनाकरीता खालील मुद्दे उपस्थित झाले. त्या कामी कारणमीमांसेसह निष्कर्ष खालील प्रमाणे नोंदवले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष.** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दि. २९/१२/२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजणेचे सुमारास हॉटेल जोतिर्लिंग चे पाठीमागे मोकळया जागेत नवे पारगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे आरोपींनी सॅक व स्टीलच्या डब्याने फिर्यादी अक्षय दिलीप शिंदे यांच्या डोक्यात मारहाण करून ईच्छापुर्वक दुखापत केली व त्यानुसार भा. दं. वि. सं. कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **नकारार्थी.** |
| २. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादीस मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केली व त्यानुसार भा. दं. वि. सं. कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **नकारार्थी.** |
| ३. | अंतिम आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

# कारणमिमांसा

## मुद्दा क्र.१ व २ करिता -

०८. मुद्दा क्र.१ व २ हे एकमेकांशी निगडित असल्याने त्यांच्या कारणांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता सदर मुद्दे विवेचनाकरीता एकत्रित विचारात घेण्यात आलेले आहेत.

०९. अभियोग पक्षाच्या पुराव्याचे विवेचन करण्यापूर्वी या ठिकाणी हे नमूद करणे न्यायोचित ठरेल की, बचाव पक्षाच्या वकिलांनी दि. २९/१२/२०१५ रोजीचे एम. एल. सी. सर्टीफिकेट - **निशाणी क्र. ५५** मान्य केले आहेत.

१०. अभियोग पक्षाने तपासलेल्या पंच साक्षीदार क्र. १ - अमित सिकंदर आढाव (अ.सा.क्र.१), यांनी त्यांच्या मौखिक पुराव्यादरम्यान असे नमूद केले आहे की, घटनास्थळ पंचनामा त्यांनी केला. अभियोग पक्षाने घेतलेल्या सदर साक्षीदाराच्या उलटतपासामध्ये त्याने कथन केले आहे की, घटनास्थळ हे गर्दीचे असते. आरोपी व फिर्यादी हे सदर साक्षीदार यांचे मित्र आहेत असे त्यांनी उलटतपासामध्ये कथन केले आहे. त्यामुळे, प्रस्तुत कामात सदर साक्षीदारावर अवलंबून राहता येत नाही.

११. अभियोग पक्षाने तपासलेल्या पंच साक्षीदार क्र. २ - मोहन शंकर सिद (अ.सा.क्र.२), यांनी त्यांच्या मौखिक पुराव्यादरम्यान असे नमूद केले आहे की, दि. ३१/१२/२०१५ रोजी पोलिसांनी त्यांना पंचनाम्यासाठी बोलावले नव्हते. त्यांनी पंचनाम्यावर सही केली होती. परंतु, त्यातील मजकूर त्यांना माहीत नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाने घेतलेल्या उलटतपासामध्ये आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये वाद झाले किंवा कसे हे त्यांना माहीत नसल्याचे कथन केले होते. तसेच, फिर्यादीच्या डोक्यात मारले किंवा कसे हे त्यांना माहीत नाही.

१२. अभियोग पक्षाने तपासलेल्या फिर्यादी साक्षीदार क्र. ३ - अक्षय दिलीप शिंदे (अ.सा.क्र.३), यांनी त्यांच्या मौखिक पुराव्यादरम्यान असे नमूद केले आहे की, दि. २९/१२/२०१५ रोजी ते कामावर जात असताना नवे पारगाव येथे गर्दी असल्यामुळे ते त्या गर्दी मध्ये खाली पडले व त्यांच्या डोक्याला लागले. तसेच, दि. २९/१२/२०१५ रोजी निलेश

कांबळे व त्यांना आरोपीने मारले नव्हते. दि. २९/१२/२०१५ रोजीचा जबाबावर सही असल्याचे त्यांनी मान्य केले. परंतु, सांगितल्याप्रमाणे मजकूर नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये त्यांची व आरोपींची तडजोड झाली असल्याचे कथन केले. तसेच, त्यांना केस पुढे चालविणेची नसून आरोपी विरूध्द त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही.

**१३.** प्रस्तुत प्रकरणातील पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसून येते की, खटल्यातील मूळ फिर्यादी साक्षीदार यांनी त्यांच्या मौखिक पुराव्यामध्ये दि. २९/१२/२०१५ रोजी नवे पारगाव येथे गर्दी असल्यामुळे ते खाली पडले व त्यांना डोक्याला लागले असे कथन केले आहे. तसेच, आरोपींनी मारहाण केली असल्याची घटना नाकारलेली आहे. तसेच अभियोग पक्षाच्या वकिलांमार्फत विचारण्यात आलेल्या उत्तरसुचक प्रश्नांना सदर साक्षीदार यांनी नकारार्थी उत्तरे दिली असून त्यांनी आरोपींविरुद्ध कोणतीही दोष सिद्ध होतील अशी विधाने केली नाहीत. त्यामुळे अभियोग पक्षास सहकार्य होईल अशी कोणतीही महत्त्वाची कबुली सरकारी वकील सदर साक्षीदाराच्या तोंडून मिळवू शकले नाहीत. यावरून फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये घडलेल्या घटनेबाबत संशय निर्माण होत आहे. तसेच प्रस्तुत कामातील मूळ फिर्यादी व आरोपी यांनी **निशाणी क्र.५२** वर पुरसिस दाखल करून त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्याचे सांगितले आहे. फिर्यादी यांना आरोपी विरूध्द कोणतीही तक्रार राहीली नसल्याने यांना पुढे चालविण्याची नाही.

**१४.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराच्या साक्षी पुराव्याचे अवलोकन करता, दि. २९/१२/२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजणेचे सुमारास हॉटेल जोतिर्लिंग चे पाठीमागे मोकळया जागेत नवे पारगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे फिर्यादी अक्षय दिलीप शिंदे व निलेश कांबळे हे आरोपी क्र. ३ च्या बोलवण्यावरून जोतिर्लिंग हॉटेल मध्ये गेले असता आरोपी क्र. १ ते ३ यांनी फिर्यादी व निलेश कांबळे यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली व आरोपी क्र. ३ ने फिर्यादीच्या डोक्यात सॅक व स्टीलचा डबा मारून जखमी केले, हे अभियोग पक्षाने निःसंशय सबळ पुराव्यानिशी शाबीत केलेले नाही. आरोपीने २९/१२/२०१५ रोजीचे एम. एल. सी. सर्टीफिकेट मान्य केले असले तरी आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये तडजोड झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सरकार पक्षाच्या कथनास पुरेसे बळ मिळत नाही व सरकारपक्षाच्या कथनाबद्दल संशय उत्पन्न होतो व संशयाचा फायदा

मिळण्याकरिता आरोपी हा पात्र आहे. अभियोग पक्षाने सदरचा गुन्हा निःसंशय सबळ पुराव्यानिशी शाबीत केलेले नाही, त्यामुळे मी मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र.०३ करिता</u>** -

**१५.** मुद्दा क्र.१ व २ करिता मी माझे निष्कर्ष नकारात्मक नोंदवलेले आहेत. आरोपींवरील आरोप अभियोग पक्षाने रास्त संशयापलीकडे सिद्ध केलेले नाहीत. त्यामुळे आरोपी संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहेत. आरोपींविरुध्द सबळ पुरावा न आल्याने आरोपीची वर नमुद गुन्हयातून निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित वाटते. सबब, मुद्दा क्र.०३ चे निष्कर्षाकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

# आदेश

| | |
|---|---|
| १. | फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये आरोपी **१. अभिषेक उर्फ अभिजित राजाराम तोडकर, २. ऋषीकेश उर्फ सुरज निवास चौगुले व ३. आकाश जयसिंग कांबळे(भोई),** यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३ सह कलम ३४ मधील गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे बंधपत्र व जामीनकतबा रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३५३(६) अन्वये न्यायनिर्णय आरोपी क्र. २ चे गैरहजेरीत घोषित करण्यात आला. प्रस्तुत आरोपी यांना असे निर्देशित करण्यात येते की, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ अन्वये या न्यायालयाचे न्यायनिर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील अथवा अर्ज दाखल झाल्यास त्यांच्यासमोर हजर रहाण्याकरिता सहा महिन्यांच्या कालावधीकरिता त्यांनी प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/- रकमेचा वैयक्तिक जामीन द्यावा. |

| | |
|---|---|
| ४. | प्रस्तुत प्रकरणामध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल एक काळया रंगाची कापडी सॅक व एक स्टीलचा चार कप्प्याचा जेवणाचा डबा अपिल कालावधीनंतर जाहीर लिलावामध्ये विक्री करून येणारी रक्कम सरकार जमा करावी. |
| ५. | सदर निकालाची एक प्रत माहितीकरिता मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे पाठविणेत यावी. |

( खुल्या न्यायालयात जाहीर व उदघोषित करण्यात आला.)

**sd/-**

**पेठ-वडगांव** **( आर.एस.मोरे )**
**दिनांक – ०७/०७/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ-वडगांव**

## भाग-क

## परिशिष्ट

## अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | अमित सिकंदर आढाव | २१ | पंच |
| अ.सा.क्र.२ | मोहन शंकर सिद | ४४ | पंच |
| अ.सा.क्र.३ | अक्षय दिलीप शिंदे | ५३ | फिर्यादी |

## अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | अ.नि.क्र. २२/ अ.सा.क्र.१ | दि. ३०.१२.२०१५ रोजीचा पंचनामा |
| २. | अ.नि.क्र. २३/ अ.सा.क्र.१ | समजुतीचा नकाशा |
| ३. | अ.नि.क्र. ४५/ अ.सा.क्र.२ | दि. ३१.१२.२०१५ रोजीच्या पंचनाम्यावरील अ. क्र. २ वरची सही |
| ४. | अ.नि.क्र. ५४/ अ.सा.क्र.३ | दि. २९.१२.२०१५ च्या जबाबावरची फिर्यादीची सही |

## आरोपी पक्षातर्फे मान्य केलेले दस्तऐवज

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | निशाणी क्र. ५५ | दि. २९/१२/२०१५ रोजीचे एम. एल. सी. सर्टीफिकेट |

sd/-

पेठ-वडगांव ( आर.एस.मोरे )

दिनांक – ०७/०७/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ-वडगांव